6:35 37%

Post

Namaste Phaltan
8 hours ago

सायबर फसवणूक टाळा - सजग व्हा याबाबत जनजागृती मोहिम

बारामती दि.
विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत विद्या प्रतिष्ठान बी.बी.ए. (सीए) विभागाच्या विद्यार्थ्यांनी "सायबर फसवणूक टाळा - सजग व्हा" या जनजागृती मोहिमेचे आयोजन केले होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी मोबाईलवर येणारे अज्ञात कॉल्स, बनावट लिंक्स, लॉटरी स्कॅम, ऑनलाइन गेमिंग फ्रॉड याविषयी माहिती दिली. शालेय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे फसवणुकीपासून वाचण्याचे मार्ग सांगितले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमात अस्मिता एकाड, अमृता सोन्ने विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे दिले. शासकीय सेवा ऑनलाईन उपलब्ध कशा होतात हे समजावून सांगितले.
तसेच, डिजीटल साक्षरतेमुळे समाजातील सर्व घटकांना मिळणारे फायदे यावर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. रोबोटिक्सचे भविष्यातील संधी आणि रोजगाराच्या नवीन शक्यता याविषयी माहिती दिली. सायबर सुरक्षा ही आजच्या डिजिटल युगातील महत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन करून विद्यार्थ्यांनी विविध उदाहरणांद्वारे सायबर फसवणुकीपासून कसे वाचता येईल याचे प्रात्यक्षिक दाखवले. उपस्थित विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि सायबर अवेअरनेसविषयी उत्सुकता व्यक्त केली.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाचा बारामती येथे झालेला हा टप्पा यशस्वी ठरला असून, विद्यार्थ्यांनी घेतलेला पुढाकार समाजात डिजिटल सुरक्षिततेबद्दल जनजागृती करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.



7

Namaste Phaltan
1.42 lakh subscribers
SUBSCRIBE

Comments